ISSN :2348-7143 (Online)
April- June- 2015

# महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे स्वरुप आणि कार्य

**प्रा. संजय शेलार,**
**साहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,**
**महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,**
**मालेगाव कॅम्प, नाशिक,**
**महाराष्ट्र, भारत.**

*आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण राहिले आहे. मुंबईतील गोकुळदास तेजपाल पाठशाळेत काँग्रेसचे पहिले अधिवेशन १८८५ साली भरले होते. पुढे बहुजन समाजाला आपल्यामध्ये सामावून घेतल्यामुळे काँग्रेसची शक्तीही वाढली आणि ग्रामीण भागातही काँग्रेसला कार्य करता आले. काँग्रेसच्याच नव्हे तर एकुणच भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण मानले जाणारे काँग्रेसचे पहिले ग्रामीण आधिवेशन हे फैजपूर येथे भरले. या सर्वच घटना महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेससाठी स्वातंत्र्योत्तर काळातदेखील लाभदायीच ठरल्या.*

ब्राह्मणेतर सुधारकांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करताच १९३७ आणि १९३८ मध्ये महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे रुप बदलू लागल्याचे स्पष्ट दिसू लागले. १९३६ सालच्या अखेरीस महाराष्ट्र प्रांतिकच्या कक्षेत येणाऱ्या अकरा जिल्हयात ४४८४६ आणि मुंबई शहरात २८२०५ काँग्रेस सदस्यांची नोंदणी झाली होती. १९३७ साली काँग्रेस निवडणुकीत विजयी होऊन तिने अधिकार ग्रहण केल्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने १ लाख ५६ हजार ८९४ सभासद नोंदवले तर मुंबई शहरातील सदस्यांची संख्या ४६ हजार झाल्याचे आढळून आले. "१९३८ च्या अखेरीस महाराष्ट्रातील सभासदांची संख्या आठ हजारांनी घटली तरी ती दीड लाखाच्या आसपास होती हे विसरुन चालणार नाही. मुंबई शहरात ती वाढतच राहिली आणि ६१६३६ इतकी झाली."[१]

**नवाकाळ या काँग्रेसनिष्ठ वृत्तपत्राने दिलेली आकडेवारी अशी होती.**[२]

| वर्ष | ग्रामीण | नागरी | एकूण |
|---|---|---|---|
| १९३५-३६ | १६५७८ | ११६८० | २८२५८ |
| १९३६-३७ | २९५१६ | १६३९९ | ४५९२५ |
| १९३७-३८ | १२६५९८ | ३७१२८ | १६३८८० |

महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने १९३७-३८ मध्ये सव्वा लाखाहून अधिक सदस्य केवळ ग्रामीण भागात नोंदवले होते आणि ही संख्या १९३६-३७ मधील ग्रामीण भागातील सदस्यांच्या संख्येपेक्षा चौपट वाढली होती. १९३५-३६ सालापर्यंत मुख्यतः शहरी भागातल्या उच्च वर्णीयांच्या प्रभावाखाली असलेली काँग्रेस खऱ्या अर्थाने बहुजनसमाजाची प्रतिनिधी बनली व ती १९३७-३८ मध्ये जागतिक मंदीच्या तडाख्यामुळे गांजलेले शेतकरी १९३०-३२ च्या आंदोलनात मोठ्या संख्येने प्रथमच सहभागी झाले. काँग्रेसमध्ये सामील झालेले ब्राह्मणेतर पक्षाचे कार्यकर्ते आणि समाजवादी विचारांनी

भारलेले तरुण यांच्या आग्रहामुळे काँग्रेस शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार करु लागली आणि अधिकारावर आलेल्या काँग्रेस पक्षाला शेतकऱ्यांचा पाठिंबा टिकवून धरण्यासाठी शेतकऱ्यांची गाऱ्हाणी लक्षात घेऊन कायदे करावे लागले.

१९३७ पर्यंत महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्षपद ब्राह्मणांनी भूषविले होते. बदलती राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन सहा वर्षांनंतर तुरुंगातून सुटलेल्या सेनापती बापटांनी ११ डिसेंबर १९३७ रोजी पत्रक काढून काँग्रेस नेत्यांना आवाहन केले. "थोडे दिवसापूर्वी म.फुले यांच्या जयंतीच्या दिवशी शनिवारवाडयापुढच्या सभेत जे दोन शब्द मी बोललो त्यात डॉ.आंबेडकर यांना कोणत्याही अटी न घालता प्रांताच्या प्रधान - मंडळात स्थान द्यावयास पाहिजे हे माझे मत मी निवेदन केले होते. केशवराव जेधे यांना महाराष्ट्राने आपल्या प्रांतिक कमेटीचा अध्यक्ष निवडावे. तुरुंगातून बाहेर आल्यावर मला समजले आहे की गेल्या सात वर्षाच्या प्रचंड उलाढालीत केशवरावजींनी धडाडीने काम केले आहे. यापुढे काँग्रेसचे काम खेडयापाडयात नेऊन दृढमुल करावयाचे आहे. त्या कामात केशवरावजींचे नेतृत्व अतिशय उपयोगी पडेल. आण्णासाहेब शिंदे यांनी तीस साली येरवडयाचा रस्ता धरला त्यावेळी गाईमागे वासरु जाते त्याप्रमाणे केशवराव त्यांच्या मागे गेले."[३]

**६.१४. महाराष्ट्राच्या खेडयातील पहिले फैजपूरचे काँग्रेस अधिवेशन**

"महाराष्ट्रात काँग्रेसचे अधिवेशन खेडयात भरवून दाखवीन अशी ब्राह्मणेतर पक्षाचे शंकरराव देवांनी गांधीजींसमक्ष पैज मारली होती."[४] पन्नास वर्षे मोठया शहरातच घुटमळणारी काँग्रेस खेडेगावाकडे वळली प्रथम १९३६ साली. १९३६ साली अ. भा. किसान सभा स्थापन करण्यात आली. तिच्यावर कम्युनिस्टांचा वरचष्मा होता. आंध्रात एन. जी. रंगा आणि बिहारमध्ये स्वामी सहजानंद यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटीत होत होते. "१९३६ सालच्या जूनमध्ये गांधीजी वर्ध्यापासून चारपाच मैल अंतरावरच्या शेगाव (सेवाग्राम) या खेडयातल्या झोपडीत राहू लागले."[५]

बहुसंख्य गांवकरी 'हरीजन' म्हणजे अस्पृश्य किंवा दलित असले तरी गावातले अल्पसंख्य सवर्ण त्यांना अपमानास्पद रीतीने वागवीत. सामान्य माणसाचे प्रश्न समजावून घेण्यासाठी अन्य काँग्रेस नेत्यांनीही खेडयात राहावे असे गांधीजींना वाटत असे. त्यामुळेच "काँग्रेसचे १९३६ सालाच्या अखेरीस भरणारे वार्षिक अधिवेशन एखाद्या खेडयात भरवावे असे त्यांना वाटत होते."[६] १९३७ च्या फेब्रुवारीत होणाऱ्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुकीआधी कामगार किसानांची तरफदारी करणारा गरीबांचा वाली असलेला पक्ष अशी पक्षाची उज्ज्वल प्रतिमा मतदारांच्या मनसमोर उभी करणे शक्य होणार होते. ९ जुलै १९३६ रोजी खानदेशातील एक काँग्रेस कार्यकर्ते गोपाळराव गोगटे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे, यंदाचे अधिवेशन खानदेशामध्ये भरवावे असे ठरले आणि ते फक्त एक मत जास्त पडून ठरले आणि हे एक मत जे जास्त पडले ते मी दिले आहे हेही सर्व मंडळींच्या लक्षात असेलच."[७] खानदेशातही कोणत्या खेडयात ते भरवावे मतभेदांना वाचा फुटू लागली.

२० सप्टेंबर १९३६ रोजी स्वागत समितीचे कार्यकारी मंडळ निवडण्यात आले. अधिवेशनासाठी निवडलेली जागा यावल आणि रावेर या तालुक्याच्या सीमेवरच्या सावदा गावापासून अनुक्रमे दीड मैल व फैजपूर गावापासून एक

फर्लांग अंतरावर होती. फैजपूर जागी असलेल्या ८५ एकर सुपीक जमिनीपैकी ४५ एकर जमीन धनाजी नाना चौधरींच्या नातेवाईकांच्या ताब्यात असल्यामुळे ती सहज मिळवता आली. एकरी चाळीस रुपये जमीनभाडे देऊन तसेच बिगरशेतीच्या कामासाठी वापर करण्यास आवश्यक तो परवाना जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळवून जमिनीबाबतचा करार महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यांनी केला. सावदा नगरपालिकेचे अध्यक्ष बी.डी.पाटील हे सरकारधार्जिण्या ब्राह्मणेतर पक्षाचे पाठीराखे होते. या धनदांडग्या सावकाराच्या दडपणामुळे सावदा आणि फैजपूर या दोन्ही गावांतील नगरपालिकांनी काँग्रेस अधिवेशनास विरोध करणारे ठराव मंजूर केले.

"काँग्रेसचे अधिवेशन दुसऱ्या कोणत्याही ठिकाणी न होता ते फैजपूरला होणेच सरकारच्या हिताचे ठरेल. जिल्हाधिकारी अमीनुद्दीन यांना मी चांगलाच ओळखतो. ते राजापेक्षाही राजनिष्ठ आहेत आणि पक्षपाती असल्याबद्दल त्यांचा लौकिक आहे."[८] काँग्रेस अधिवेशन होण्यापूर्वीच अमीनुद्दीन त्यात नाक खुपशील आणि हस्तक्षेप करील अशी आपणास भीती वाटत असल्याचे आर.एम.मॅक्सवेल या गृहसचिवाने टिप्पणीत नमुद केलेले आढळते. "फैजपूरला काँग्रेसचे अधिवेशन घेण्याचा हट्ट गांधींनी धरला होता अशी सरकारची माहिती होती आणि असल्या जागी वार्षिक अधिवेशन घेतले गेल्यास सपशेल बोजवारा उडणार अशी मुंबईचे गव्हर्नर ब्रेबर्न आणि हिंदुस्थान सरकारचे गृहमंत्री हेन्री क्रेक यांची खात्री झाली होती." म्हणूनच मानभावीपणाने काँग्रेसशी सहकार्य केल्याचे नाटक करण्यात येत होते. जी.आय.पी.रेल्वेने फैजपूरला जाणाऱ्या प्रवाशांसाठी सवलतीचे दर जाहीर केले.

**६.१५. फैजपूर**

१५ ऑक्टोबर १९३६ च्या कार्यकारिणीच्या बैठकीत अधिवेशनास एक लाख चाळीस हजार रुपये खर्च येईल असे गृहित धरुन अंदाजपत्रक तयार करण्यात आले. या खर्चापैकी खानदेशने पंधरावीस हजार रुपये गोळा करुन द्यावेत असे शंकरराव देवांनी सांगितले. अधिवेशनाच्या कार्यकारी समितीचे एक सदस्य यावलचे माधव मार्तंड देशपांडे यांनी स्वतः एकरकमी वीस हजार रुपये दिले. प्रत्यक्षात खानदेशकडून जेवढा निधी अपेक्षित होता त्यापेक्षा कितीतरी जास्त पैसा खानदेशातून गोळा झाला."[९] १९३७ पर्यंत काँग्रेसची वार्षिक अधिवेशने शक्यतो साधेपणाने आणि काटकसरीने साजरी केली जात असत. १९३७ नंतर काँग्रेस काही प्रांतात सत्तेवर आल्यानंतर अधिवेशनांचा थाटमाट, नेत्यासाठी करण्यात येणाऱ्या सुखसोयी वाढल्या. स्वातंत्र्योत्तर काळात तर काँग्रेस अधिवेशनांना उरुसाची किंवा जत्रेची कळा आली. अलीकडच्या काळात तर या अधिवेशनांना अपना उत्सव चे वैभवशाली रुप लाभले. सरकारी यंत्रणेचा बिनदिक्कत वापर करण्यात येऊ लागला.

फैजपूर अधिवेशापूर्वी खानदेशातील खेडयापाडयात प्रचारसमितीचे चिटणीस एस.एम.जोशी यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी अक्षरशः पायपीट करुन काँग्रेसचा संदेश निरक्षर, गरीब शेतकऱ्यांपर्यंत पोहचवला. पायी चालण्याला पदयात्रेची प्रतिष्ठा लाभली ती स्वांत्र्योत्तर काळात. ती काढणारे दुरुन का होईना दर्शन होऊ लागले ते अगदी अलीकडे. धनाजी नाना चौधरी, सीतारामभाऊ चौधरी, तासतासभर अवखळ विनोदाने निरक्षर श्रोत्यांना भुलवणारे लोढूभाऊ फेगडे

यांच्यासारखेच पट्टीचे वक्ते, श्रोत्यांच्या काळजाला हात घालणार आणि त्यांची मने पेटवणारे साने गुरुजी वगैरेंनी खानदेशातील खेडी पालथी घातली. अधिवेशनाच्या वेळी पु.ह.(रावसाहेब) पटवर्धनांच्या नेतृत्वाखाली सातआठशे जणांचे स्वंयसेवक दल सज्ज होते. एस.एम.जोशींनी म्हटले आहे, "राष्ट्रसेवा दल म्हणून पहिल्याने जे काही महाराष्ट्रात उभे राहिले ते रावसाहेब पटवर्धनांच्या नेतृत्वाखाली फैजपूर येथे."[१०]

मुंबईतील गोकुळदास तेजपाल पाठशाळेत काँग्रेसचे पहिले अधिवेशन १८८५ साली भरले होते. त्या ऐतिहासिक जागेपासून एक मशाल आणि झेंडा घेऊन टप्प्याटप्प्याने धावत गोकुळभाई भट्ट आणि अन्य काँग्रेस कार्यकर्त्यांनी ती फैजपूरला नेली आणि टिळकनगर या अधिवेशनाच्या जागी स्वागतसमितीचे चिटणीस गो.आ.(तात्यासाहेब) देशपांडे यांनी धावत जाऊन पोहचवली. मशाल शंकरराव देवांनी हातात धरली आणि अध्यक्ष जवाहरलाल नेहरुंनी झेंडा फडकावला. मशाल व झेंडा घेऊन मैलनमैल धावण्याचा हा उपक्रम आता आपल्या इतक्या ओळखीचा झाला आहे की या उपक्रमास प्रथमच फैजपूर काँग्रेसच्या वेळी सुरुवात झाली हे आज अनेकांना माहितही नसते. झेंडावंदनाच्या वेळी ऐंशी फूट उंचीच्या खांबावर फडकावण्यात आलेला ध्वज दोरीला तिढा पडल्याने अडकला व अर्ध्यावरच उतरवल्यासारखा दिसू लागला. तेव्हा रत्नागिरीहून आलेल्या के.ए.रणजित नावाच्या धाडसी युवकाने सरसर खांबावर चढून तिढा सोडवला आणि झेंडा डौलाने फडकू लागला.

फैजपूर अधिवेशनाचा बोऱ्या वाजणार अशी खात्री झालेल्या राज्यकर्त्यांनाही "खेडयात भरलेले काँग्रेसचे हे पहिले अधिवेशन विलक्षण यशस्वी झाले असल्याचे" मान्य करावे लागले. २३ डिसेंबर १९३६ रोजी एन.पी.ए.स्मिथने हिंदुस्थान सरकारला पाठवलेल्या अहवालात तशी स्पष्ट कबुली देऊन म्हटले होते. दोन लाख लोकांनी काँग्रेसच्या मंडपास भेट दिली असून त्यापैकी एक लाख खेडूत होते. त्यांच्यापैकी काहीजण कित्येक मैल अंतरावरुन आले होते. संयोजकांनी बरेच संघटना कौशल्य दाखवले. व्यवस्था पुरी पडली तरी सर्वसाधारणपणे समाधानकारक होती. काटकसर आणि साधेपणा हे या अधिवेशनाचे ठळक विशेष होते. सतराशे स्वयंसेवकांपैकी दोनशे स्त्रिया होत्या. त्यामध्ये मुलींचे प्रमाण मोठे होते ते पाहून मला नवल वाटले. ब्रिटनमध्ये कोवळया वयाच्या मुलीला असा प्रचंड राजकीय स्वरुपाच्या मेळाव्यात भाग घेण्यास पाठवण्याचे स्वातंत्र्य देण्याचा धोका कोणताही इंग्रज बाप पत्करील असे मला वाटत नाही."[११] काँग्रेसच्या अधिवेशनाची व्यवस्था चोख ठेवलेली असून ते अत्यंत कार्यक्षम पध्दतीने संघटीत केले असल्याची आणि स्वयंसेवकांनी वाहतुकीचे नियंत्रण अतिशय शिस्तबध्द रीतीने केले असल्याची नोंद मुंबई सरकारच्या गुप्तचर विभागानेही घेतलेली आहे. विस्तृत अहवाल पाठवणाऱ्याने काढलेले निष्कर्षही लक्षात घेण्यासारखे आहेत.[१२]

१) ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यकर्त्यांमुळे काँग्रेसचे बळ वाढले आहे.

२) काँग्रेसमधील मतभेद मिटवण्यात आले असून ताबडतोब पक्षात फूट पडेल असे दिसत नाही.

३) अधिकार स्विकरण्याबाबत अद्याप निश्चित निर्णय घेतलेला नसून तो प्रश्न पुढे ढकलण्यात आला आहे. पुढे काँग्रेसने अधिकारपदे घेतलीच तरी ती १९३५ च्या कायद्यान्वये अंमलात येणारी घटना मोडण्यासाठीच घेतली जातील.

४ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यकर्त्यामुळे कॉंग्रेसमधील समाजवाद्यांचे बळ वाढत असले तरी ते झपाटयाने वाढते आहे.

५) आणखी एकदा जनआंदोलन करण्याचा विचार सर्वसामान्यतः स्विकारण्यात आला आहे.

६) गांधीचा पक्षावर जबरदस्त प्रभाव आहे आणि त्यांचे सामर्थ्य वाढते आहे. ते अधिवेशनाला उपस्थित असल्यामुळेच ब्राह्मणेतर पक्षाच्या कार्यकर्त्यांनी गर्दी केल्याचे दिसते आहे.

**संदर्भ टीपा :**

१. बॉम्बे प्रेसिडेन्सी ***पोलीस ॲबस्ट्रॅक्ट ऑफ इटेजिजन्स,*** १० डिसेंबर, १९३८, खंड५१, पृ.४२७.
२. ***नवाकाळ,*** २६ जुलै, १९३८.
३. बापट वामनराव, (संपा.), ***सेनापती बापट वाडमय-समग्र,*** खंड-४, १९८८, पृ.२८१-२८२.
४. कंटक प्रेमा, ***सत्याग्रही महाराष्ट्र,*** सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, १९४०, पृ.३७३.
५. Nanda: B.R, (Ed.) : ***Essays On Modern Indian History***, Dhlhi, Oxfort University Press, १९८८, Pg.२२०.
६. ***बॉम्बे क्रॉनीकल,*** २३.०५.१९३६.
७. गोपाळराव गोगटे पत्रव्यवहार, ***शंकरराव देवांचे गोपाळराव*** गोगटयांना पत्र, ९.७.१९३६.
८. हिंदुस्थान सरकार : गृह / ***राजकीय खाते,*** फाईल क्र.४/३५/३६, १९३६, डिसेंबर १९३६, फैजपूर कॉंग्रेस.
९. जोशी एस.एम.: ***मी एस.एम.,*** १९८४, पृ.९०.
१०. ***कित्ता,*** पृ.८६.
११. हिंदुस्थान सरकार : ***गृह / राजकीय खाते,*** फाईल क्र.४/३५/३६, १९३६, डिसेंबर १९३६, फैजपूर कॉंग्रेस.
१२. बॉम्बे प्रेसिडेन्सी ***पोलिस ॲबस्ट्रॅक्ट ऑफ इटेजिजन्स,*** फैजपूर, १९३० ते ३९.